महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ 922 दिनांक : 20 MAR 2020

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय:- **या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या सर्व व्यावसायिक शिक्षण संस्थांतील दि.२५.०३.२०२० पर्यत घरी राहून कामकाज (Work From Home) करणा-या अध्यापकांचा अहवाल घेणेबाबत. . . .**

संदर्भ:- १. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. संकीर्ण/२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दि.१६.०३.२०२०
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०२०/१५०, दि. १६/०३/२०२०

उपरोक्त संदर्भीय पत्रानूसार राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायायोजनेचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यांत आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदी नूसार सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याच प्रमाणे या संस्थांमधील सर्व अध्यापकांना दिनांक २५.०३.२०२० पर्यंत घरी राहून कामकाज (Work From Home) करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

घरी राहून कामकाज (Work From Home) या संकल्पनेअंतर्गत खालील बाबींचा समावेश करता येईल. सदर संकल्पनेसाठी Whatsapp Group/E-mail इ. माध्यमांचा उपयोग करता येईल.

- विद्यार्थ्यांना १५ मार्च पर्यंत पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमावर Home Assignment देणे.
- ऑनलाईन लेक्चर Whatsapp Group/E-mail इ. माध्यमांचा वापर करुन विद्यार्थ्यांना शेअर करणे.
- इग्रजी विषयांच्या Assignment देणे
- जुन्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्याकडुन सोडवून घेणे.
- विद्यार्थ्यांना लर्निंग मटेरीअल शेअर करणे.
- Coursera या संकेतस्थळावर Registration करुन विविध कोर्सेस पूर्ण करणे.

- परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करणे.
- अभ्यासासाठी वेगवेगळया वेबसाईट विद्यार्थ्यांना शेअर करणे.
- विविध अभ्यासक्रमावर व्हीडीओ बनवणे व विद्यार्थ्यांना शेअर करणे.
- घेतलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नपत्रिका तयार करणे व विद्यार्थ्यांस शेअर करणे.
- Work From Home या कालावधीतील अभ्यासक्रम भरुन काढण्यासाठी अतिरिक्त तासांचे वेळापत्रक तयार करणे.

या अनुषंगाने आपल्या संस्थेतील जे अध्यापक घरी राहून कामकाज (Work From Home) करीत आहेत, त्यांच्या बाबत दिनांक २५.०३.२०२० पर्यंत केलेल्या कामकाजाचा अध्यापकनिहाय अहवाल घेण्यात यावा. आपल्या संस्थेतील अध्यापकांचा एकत्रित अहवाल दिनांक दिनांक ३०.०३.२०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

**(महेश द.शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.